म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा-वा
दा. क्र. ६२५०




IRBK-0106250
IRBK-0106250

दा० क्र० ६२५० 



२२५८७ वाचनालय २४ ६२५० ३०।११।५७

भारतीय सण व उत्सव

# माघ मास

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा
दा. क्र. ६२५० ओं. क्रि.
वि. ... ग्रो.प.१ क्र. ...

लेखिका

सौ. कुमुदिनी रांगणेकर, मुंबई.

संपादक मंडळ

डॉ. ग. श्री. खैर, एम्.ए., पीएच्.डी.
श्री. दि. दा. गांगल, एम्.एस्सी.
प्रा. रा. वि. ओतुरकर, एम्.ए.
श्री. मु. ल. जोशी, एम्. ईडी., बी.एस्सी.
श्री. उ. र. सेवलेकर, बी.ए. (ऑ.), एम्. ईडी.
श्री. शं. दा. चितळे, एम्.ए., बी.टी., [illegible] संपादक

IRBK-0106250

१८७८ ] [ १९५७

सर्वाधिकार स्वरक्षित आवृत्ति पहिली

## संपादकीय

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीच्या काळांत वर्षांत येणाऱ्या सणा-उत्सवांची माहिती आजी अगर आजोबा ह्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत असे. कित्येक वेळां त्यांतील कांहीं उत्सव घरीं साजरे केले जात व बाहेरच्या उत्सवासहि मुलें जात. त्यामुळें भारतीय संस्कृतीची व परंपरेची थोडी का होईना, मुलांना लहानपणींच माहिती मिळे. राम-कृष्णादिकांची प्रथम ओळख आई-वडिलांनीं सांगितलेल्या गोष्टींपासूनच मुलांना पूर्वी होत असे. परंतु एकत्र कुटुंबपद्धतीचा अभाव, पालकांचा उद्योग-व्यवसाय, उत्सवांचें सध्यांचें घटतें प्रमाण इ. मुळें आज तशी स्थिति राहिलेली नाहीं. छोट्या-छोट्या पुस्तिकांच्या वाचनानें ही ओळख मुलांना करून द्यावी या दृष्टीनें आम्ही भारतीय सण व उत्सवांसंबंधीं प्रत्येक महिन्याची एक अशा १२ पुस्तिका प्रकाशित करीत आहोंत. सौ. रांगणेकर यांच्यासारख्या नांवाजलेल्या लेखिकेनें आत्मीयतेनें सोप्या भाषेंत थोडक्यांत पुष्कळ माहिती दिली असून पुस्तिकांसाठीं योग्य अशीं चित्रेंहि श्री. गोलिवडेकरांनीं काढून दिलेलीं आहेत. बालकांना व प्रौढ साक्षरांना हीं पुस्तकें आवडतील असा आम्हांस भरंवसा आहे.

### १. मालेंतील पुस्तकांचा उपयोग :

(१) नवसाक्षर नागरिकालाहि आवश्यक असें ज्ञान मालेमुळें मिळतें.

(२) कॉलेज, हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज यांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या विषयांस पूरक अशी माहिती या पुस्तकांत दिलेली आहे.

(३) घरांतील खाजगी ग्रंथालयें, संघ, दल या संस्थांचीं वाचनालयें व प्रौढांचे शिक्षणवर्ग यांसाठीं.

(४) वाढदिवस, मुंज, विवाह या मंगलप्रसंगीं भेट देण्यासाठीं; शाळा, कॉलेज अगर तत्सम संमेलनप्रसंगीं पारितोषिक म्हणून.

### २. पुस्तकांतील विषयांचें स्वरूप :

★ सुसंस्कृत नागरिकास असें वाटत असतें कीं, आपल्या सभोंवतालच्या वस्तु (विमान, रेडिओ, विजेची शक्ति इ.), राजकारणांतील चालू प्रश्न; थोर पूर्वजांचीं चरित्रें, निरनिराळ्या देशांचे स्वातंत्र्येतिहास—यांची माहिती आपणांस असावी. मालेसाठीं विषय निवडतांना वरील दृष्टि ठेविली आहे.

★ शाळेंत स्थूलमानानें ज्या विषयांचें शिक्षण होतें त्या विषयांना पूरक व उपकारक अशी माहितीहि या पुस्तकांतून असते.

★ मनोरंजक पद्धतीनें उपयुक्त विषयांचें ज्ञान, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आणि स्त्री-पुरुष नागरिकांना घरबसल्या देणें हा मालेचा हेतु आहे.

२२६७९
30-११-

# माघ मास

या महिन्यांतच शिवरात्र येते व या दिवशीं भारतांत शंकराचीं जोतिर्लिगें असलेल्या बारा गांवीं मोठा उत्सव व यात्रा भरते. नाशिक जिल्ह्यांतील त्र्यंबकेश्वर हें बारा ज्योतिर्लिगांपैकीं एक असून शिवरात्रीच्या दिवशीं येथें मोठा उत्सव असतो. थोडक्यांत, शंकराचा आवडता दिवस या महिन्यांत येतो असें या महिन्याचें महत्त्व आहे.

आतां माघ महिना सुरू झाला अन् शेवटला शिशिर ऋतूहि सुरु झाला.

ह्या महिन्यांत लग्नमुंजीचे मुहूर्त असतात. त्यामुळें बायकांची धांदल असते. मुलांनाहि अशा प्रसंगीं लुडबुडतांना गंमत वाटते.

माघ महिन्यांत तीर्थाच्या ठिकाणीं स्नान केल्यानें पुण्य लागतें, असें पुराणांत सांगितलें आहे.

## माघस्नान

त्याचप्रमाणें प्रयागक्षेत्रांत स्त्रियांनीं व पुरुषांनीं क्षौर करणें पुण्यदायक आहे, असें उत्तरेकडील लोक मानतात. क्षौर करणें म्हणजे केंस पार कापणें. तेथील कांहीं सौभाग्यवती स्त्रिया-

सुद्धां क्षौर करतात. कांहीं स्त्रिया वेणीदान करतात. केंसांची तिपेडी वेणी घालून ती नवऱ्याच्या हातून कापून त्रिवेणीसंगमांत टाकतात. म्हणजे अखंड सौभाग्य प्राप्त होतें असें मानतात. कांहीं स्त्रिया दोन अंगुळें केंस कापतात नि तेंच वेणीदान समजतात.

सौभाग्याच्या वस्तु दान केल्या कीं, पतीचें आयुष्य म्हणजेच आपलें सौभाग्य वाढतें, अशी जुन्या स्त्रियांची कल्पना होती. आजकालसुद्धां संक्रान्तीच्या हळदकुंकवांत हळद व कुंकू लुटण्याची चाल आहे. त्याचप्रमाणें कांचेच्या बांगड्यांचीं वाणें देतात. त्रिवेणीसंगमांत वेणीदान करण्याची उत्तरेकडील पद्धत हा ह्यांतलाच जरा विचित्र भासणारा प्रकार आहे.

### वसंतपंचमी

माघ शुद्ध पंचमीला वसंतपंचमी म्हणतात. वास्तविक आतां नुकता शिशिर ऋतूला प्रारंभ झाला. माघ व फाल्गुन हे दोन महिने संपल्यावर वसंताची सुरुवात होणार. पण ह्या दिवसांत हवा चांगली असते. शरीराला सुखकारक वाटेल इतपत थंडी असते. तेव्हां इथूनच वसंतोत्सवाला आरंभ झाला असें धरतात. ह्या काळांत मनाला आनंद वाटत असतो म्हणून ह्या पंचमीला वसंतोत्सवाचा प्रारंभ झाला असें म्हणावयाचें.

माघ महिन्यांत देवीच्या देवळांत नृत्य-गायनाचे उत्सव चालतात. गूळ मिसळलेल्या थंड पाण्यांत वेलदोड्याची व मिऱ्याची बुकी घालून एक पेय तयार करतात. त्याला पानक म्हणतात. हें पानक आणि मुगाच्या डाळीची कोशिंबीर मित्रमंडळींना वांटण्याची कर्नाटकाच्या कांहीं भागांत चाल आहे.

महाराष्ट्रांत चैत्रांत आंब्याचें पन्हें व हरभऱ्याच्या डाळीची कोशिंबीर वांटतात.

बंगालमध्यें ह्या वसंतपंचमीला श्रीपंचमी मानतात. शाई, दौत, लेखण्या, पुस्तकें ह्यांसह श्रीसरस्वतीच्या मूर्तीची ह्या दिवशीं पूजा करतात. महाराष्ट्रांतील दसऱ्याप्रमाणें इथें ह्या दिवशीं मुलांच्या नवीन शिक्षणाला प्रारंभ करतात.

श्रीपंचमीला लेखनाचें काम बंद असतें. तितकेंच महत्त्वाचें काम असलें तर खडूनें किंवा कोळशानें फळीवर लिहितात.

उत्तरेकडील प्रदेशांत अद्यापि कांहीं फार भाविक लोक आहेत. सरस्वतीपूजनाच्या दिवशीं एकादी तार आली तरी ते उघडून पाहात नाहींत.

श्रीपंचमीच्या दिवशीं संध्याकाळीं मुलें खेळ खेळतात आणि दुसऱ्याच्या बागेंत शिरून फळें, फुलें लुटण्याची आज आपल्याला पूर्ण मुभा आहे असें समजतात.

तुलसीविवाहापूर्वी आंवळे, चिंचा वगैरे खाऊं नये, असें आपल्या इथें महाराष्ट्रांत बंधन आहे. त्याचप्रमाणें सरस्वतीपूजनापूर्वीं तिथें ह्या वस्तु खात नाहींत.

पूजेच्या दुसऱ्या दिवशीं विसर्जनाचा मोठा बोवाळ असतो. आपण गणपतीची मूर्ति विसर्जन करतों त्याप्रमाणें शारदादेवीची मूर्ति मिरवत नेऊन नदींत किंवा विहिरीतळ्यांत विसर्जन करतात.

## रथसप्तमी

त्यानंतर शुद्ध सप्तमीला रथसप्तमी किंवा महासप्तमी म्हणतात. संक्रांतीनिमित्त स्त्रिया पौषांत हळदकुंकू करतात. रथसप्तमीपर्यंत हें हळदकुंकू करण्याची कालमर्यादा असते. रथ-

सप्तमीला सकाळीं पूर्वदिशेकडे लहान मातीच्या भांड्यांत दूध तापवितात व सूर्याची पूजा करतात.



रथसप्तमीला सूर्यदेव आपला सात घोड्यांचा रथ जुपून हिंडावयास जातो, असा समज आहे. हे सात घोडे म्हणजे प्रकाशांत दिसणारे सात रंग नि सूर्य हा तेजोमय गोल असला तरी त्याला देव मानला आहे.

पुराणांत रथसप्तमीची कथा अशी सांगितली आहे.

सातव्या शतकांत कांबोज देशांत यशोवर्मा ह्या नांवाचा राजा राज्य करीत होता. यशोवर्मा हिंदु होता. त्याची कारकीर्द भरभराटीची झाली. त्यानें यशोधरपूर ह्या नांवाची मोठी नगरी वसविली.

ह्या यशोवर्मा राजाला उतारवयांत मुलगा झाला. तो नेहमीं आजारी असे. त्याची प्रकृति सुधारण्यासाठीं राजानें पुष्कळ प्रयत्न केले; पण कांहीं गुण येईना. तेव्हां त्यानें ज्योतिष्याचें मत घेतलें. त्यानें रथसप्तमीच्या दिवशीं व्रतस्थ राहून सूर्यपूजा करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें यशोवर्म्यानें रथसप्तमीला उपास केला नि सूर्याची पूजा केली. तेव्हांपासून राजपुत्राच्या

प्रकृतींत हळूहळू सुधारणा होत गेली व कांहीं दिवसांनीं त्याची कांति तेजःपुंज झाली.

रथसप्तमीच्या ह्या कथेंत फार अर्थ सांठविला आहे. सूर्यापासून प्राणिमात्राला उष्णता, प्रकाश व अन्न वगैरे गोष्टी मिळतात. सूर्याच्या उन्हामुळें जंतुनाश होतो. सूर्यकिरण रक्त वाढण्यास मदत करतात. सूर्यकिरणांपासून आपल्याला जीवन सत्त्वें मिळतात. त्यामुळें सूर्याची उपासना केल्यानें प्रकृति सुदृढ होणारच !

जुन्या आर्य लोकांनीं सूर्याला देव मानलें होतें. त्यामुळें त्यांच्या ग्रंथांत सूर्याविषयीं अनेक कथा आढळून येतात. कश्यप



हा सूर्याचा बाप व अदिति ही त्याची आई आहे. आणि अश्विनी ही सूर्याची पत्नी आहे असें मानतात. अश्विनीला यम, यमी ऊर्फ यमुना, अश्विनीकुमार व शनि अशीं मुलें झालीं.

पैकीं यम व यमी ह्यांची माहिती भाऊबिजेच्या सणाच्या वेळीं कळली. अश्विनीकुमार हे जुळे भाऊ असून त्यांना धन्वंतरी

म्हणतात. धन्वंतरी म्हणजे वैद्य. ते देवांचे वैद्य आहेत अशी कल्पना आहे.

सूर्य हा तेजस्वी तारा आहे. त्याच्यापासून अनेक तुकडे फुटून निघाले. त्यांपैकींच एक आपली पृथ्वी आहे. ह्याशिवाय शनि, मंगळ, शुक्र, गुरु वगैरे अनेक ग्रह हीं सूर्याचीच लेंकरें म्हणावयाचीं.

सूर्योपासना करण्याचा अलीकडील वेगळा प्रकार आहे. नि तो म्हणजे सूर्यनमस्कार घालण्याचा. सूर्याला निदान बारा तरी साष्टांग नमस्कार घालण्याचा अनेक लोकांचा नियम असतो. सूयनमस्कार घालते वेळीं सूर्याच्या बारा नांवांपैकीं एकेक नांवाचा उच्चार करतात.

तीं नांवें अशीं आहेत—(१) मित्र (२) रवि (३) सूर्य (४) भानू (५) खग (६) पूषन (७) हिरण्यगर्भ (८) मरीचि (९) आदित्य (१०) सविता (११) अर्क व (१२) भास्कर.

सर्व मुलांमुलींनीं रोज कमींत कमी बारा सूर्यनमस्कार घालण्याचा नियम करावा म्हणजे सूर्योपासना केल्यासारखें होईल !

ह्यानंतर माघ कृष्ण प्रतिपदेला नरहरि सोनार ह्या भगवद्भक्ताची पुण्यतिथि येते.

## नरहरि सोनार पुण्यतिथि

नरहरि सोनार पंढरपुरांत राहात होता. पंढरपुरांतला प्रसिद्ध सोनार होता तो ! अन् मोठा शिवभक्त होता. रात्रंदिवस त्याच्या तोंडीं 'हरहर शंभो' हे शब्द असावयाचे. त्यामुळें पंढरपुरांत राहात असूनहि तो कधीं विठोबाच्या दर्शनाला गेला

नाहीं. कारण विठोबा हा विष्णूचा अवतार. म्हणजे हरि ना तो ? तिथें हरहरीचा भेद आलाच ! शैव वैष्णव हा वाद निघालाच ! त्यामुळें नरहरि सोनार आपल्या देवघरांतील शिवलिंगाची मनः-पूर्वक पूजाअर्चा करावयाचा.

एकदां काय झालें, एका सावकारानें पंढरीनाथाला नवस केला होता. तो पुष्कळ श्रीमंत होता. त्याच्या घरांत गडगंज श्रीमंती होती. धनधान्यानें घर भरलें होतें. पण एका गोष्टीची कमतरता होती. घरांत गृहरत्न नव्हतें. मूल म्हणजे गृहरत्न नि तेंच नव्हतें त्या सावकाराला. त्यामुळें तो भारी कष्टी असे !

त्या सावकारानें विठोबाला असा नवस केला होता कीं, " मला मुलगा झाला तर मी तुला सुवर्णाचा करगोटा वाहीन. "

देव नवसाला पावला. सावकाराला पुढल्या वर्षी मुलगा झाला. त्या गृहरत्नामुळें त्याच्या घराची शोभा वाढली. अर्थातच. सावकार नवस फेडण्याच्या तयारीला लागला.

त्यावेळीं नरहरि हा पंढरपुरांतला सर्वांत कसबी सोनार होता. त्याच्यासारखे दागिने कोणालाच घडवितां येत नव्हते. आणि तो अत्यंत प्रामाणिक सोनार होता.

सावकार त्याच्याकडे गेला. नरहरीनें त्याचें स्वागत केलें, बसावयाला आसन दिलें नि आर्जवानें विचारलें, " आज एवढें महत्त्वाचें काय काम काढलंय् आपण ? अगदीं स्वतः दुकानावर खेप टाकली ?"

" मग तसेंच महत्त्वाचें काम आहे सोनारबाबा. हिरें, माणकें जडविलेला छानदार सोन्याचा करगोटा हवा आहे मला. अन् शक्य तों लौकर हवा आहे .केव्हां द्याल बरं लौकरांत लौकर !"

"नौकर हवा आहे ? हां ऽ हां ऽ ! लहानग्या सावकारांना करणार होय ? वा: वा: ! अगदीं म्हणाल तेव्हां देतों. येत्या एकादशीला देऊं का ?" नरहरीनें अदबीनें विचारलें.

"वाहवा ! अगदीं विठोबाच तुमच्या तोंडून बोलला हं ! सोनारबाबा, पंढरीनाथाला सोन्याचा करगोटा करण्याचा नवस केला होता आम्हीं. तो फेडणार आहोंत आतां. तेव्हां माझ्या बरोबर चला बरं आतां देवळांत. पांडुरंगाच्या कमरेचें तुम्हीं स्वत:च माप घ्या. म्हणजे एवढीसुद्धां कसूर राहणार नाहीं कामांत. माझी गाडी बाहेर उभी आहे. चला जाऊं या देवळांत."

"छे: छे: ! मीं नाहीं येणार देवळांत. तुमच्या विठोबाचें मला नाहीं दर्शन घ्यायचें !" नरहरि तटकन् बोलला अन् मग स्वत:ला आंवरीत तो नम्रपणें पुढें म्हणाला, "सावकार तें नाहीं जमणार माझ्यानें. भगवान् शंकर हेंच माझें दैवत ! इतर देवांच्या दर्शनाला मीं कधीं जाणार नाहीं. आपण दुसऱ्या सोनाराकडून काम करून घ्या."

हें ऐकून सावकार खट्टु झाले. विठोबाचा करगोटा नरहरीनेंच करावा, अशी त्याची फार इच्छा होती. शेवटीं त्यांनीं स्वत: देवळांत जाऊन माप आणलें आणि नरहरीकडे दिलें. त्या मापा-प्रमाणें नरहरीनें उत्कृष्ट करगोटा तयार केला. त्यांत त्यानें आपलें सर्व कौशल्य ओतलें होतें. एकादशीला करगोटा देण्याचा वायदा होता. पण नरहरीनें तो दशमीलाच दिला. करगोटा पाहून सावकार खूष झाला. एकादशीला सकाळीं मोठ्या आनंदानें सावकार आणि सावकारीण मुलाला घेऊन नवस फेडण्यासाठीं पांडुरंगाच्या देवळांत गेलीं. त्यांनीं षोडशोपचारें विठोबाची पूजा केली, मुलाला

विठ्ठलाच्या पायांवर घातलें आणि सावकार स्वतः तो करगोटा पंढरीनाथाच्या कंबरेला बांधूं लागले.

पण हें काय ? करगोटा आंखूड कसा झाला ? विठोबाच्या कंबरेला येईनाच मुळीं तो. सावकारानें तो माणसाबरोबर नरहरी-कडे पाठविला. आणि थोडा सैल करून मागितला. नरहरीनें तो वाढवून दिला. पण छेः ! आतां तो करगोटा पांडुरंगाला फार सैल होऊं लागला. सावकार हिरमुसला झाला. तो स्वतःच नरहरी-कडे गेला आणि म्हणाला "पाहिलेंत ना ? तुम्हीं स्वतः माप न घेतल्यामुळें हा सारा घोंटाळा झाला ! उगीच तुम्हीं शिवभक्तीचें स्तोम माजविलें आहे ! "

" नाहीं, सावकार तें स्तोम नाहीं ! माझी दृढ श्रद्धा आहे ती ! " नरहरीनें स्पष्ट उत्तर दिलें.

" ठीक ! तुमची श्रद्धा असेल तशी ! अन् तुम्हांला विठ्ठलाचें दर्शन घ्यावयाचें नाहीं ना ? हरकत नाहीं ! नका घेऊं तुम्हीं दर्शन. मी तुमचे डोळे कापडाच्या पट्टीनें बांधतों म्हणजे तुम्हांला विठोबाचें दर्शन होणार नाहीं. तुम्ही फक्त हातानें नेमकं माप घ्या म्हणजे झालं ! " सावकारानें समजूत घातली.

नरहरीला आतां सावकाराचा शब्द मोडवेना. तो खरा कलावंत होता. आपण केलेला करगोटा मनासारखा झाला नाहीं ह्याचा खेद वाटत होता त्याला. त्यामुळें सावकाराचें म्हणणें त्यानें मान्य केलें. नरहरीचे डोळे कापडाच्या पट्टीनें बांधून सावकारानें त्याला पांडुरंगाच्या मूर्तीजवळ नेलें. नरहरी विठ्ठलाची मूर्ति चांचपूं लागला.

२२६७९

हा काय चमत्कार ? चतुर्भुज विठ्ठलाऐवजीं हा पचवदन शंकर नाहीं ना ? अन् गळयांत विठोबाच्या वैजयंती माळेऐवजीं



सर्पाचा वेढा ? मस्तकावर मुकुटाऐवजीं जटेचा भार ?—छे: छे: ! हा पंचवदन शंकरच आहे ! अन् हातांत डमरू नि त्रिशूळ !

"वेडा तर नाहीं मीं ? भगवान् शंकर माझ्या समोर असतांना मीं अभागी डोळे मिटून घेतों आहें ? "––अन् असें पुटपुटत नरहरीनें डोळयांवरील कपडा काढला.

अन् पहातो तर काय ? कटीवर हात ठेवून चतुर्भुज विठोबा आपला विटेवर उभा ! ––नरहरीनें गपकन् डोळे मिटून घेतले नि हातांनीं चांचपून पाहिलें. तर पुनः मघांप्रमाणेंच शंकराची मूर्तीच हातांना भासूं लागली.

नरहरी चांगलाच गोंधळला आणि श्रीशंकराचा धांवा करूं लागला. त्यासरशीं विठ्ठलाच्या कृपेनें त्याला दिव्यदृष्टि आली आणि श्रीशंकर आणि विठ्ठल हे एकच आहेत हें त्याला उमगलें.

त्या दिवसापासून नरहरीच्या मनांतील द्वैत--भेदभाव--नाहींसा झाला. पुढें ज्ञानेश्वरांनीं त्याला उत्तम उपदेश केला. त्यानें ज्ञानेश्वर, नामदेव वगैरे संतांबरोबर तीर्थयात्रा केल्या आणि पंढरपुरांतच माघ कृष्ण प्रतिपदेला त्यानें ह्या जगाचा निरोप घेतला.

**श्रीधरस्वामी पुण्यतिथि**

ह्यानंतर माघ कृष्ण तृतीयेला एका कवीची पुण्यतिथि येते. हा कवी अडीचशें वर्षांपूर्वी होऊन गेला. ह्याचें नांव श्रीधर.

पंढरपुराजवळ नाझरें म्हणून गांव आहे. तिथल्या कुळकर्ण्यांचा हा मुलगा. ह्यानें लग्न केलें होतें. त्याला मुलेंहि होतीं. म्हणजे तो गृहस्थाश्रमी होता. पण त्याचें मन संसारांत रमत नसे. चित्त नेहमीं उदास असे.

शेवटीं त्यानें संन्यास घेतला. हा तीर्थयात्रा करीत हिंडावयाचा. परंतु त्याचें रहाण्याचें ठिकाण पंढरपूर होतें.

संस्कृतांतील पौराणिक ग्रंथांच्या आधारानें त्यानें पुष्कळ ग्रंथ मराठींत लिहिले. त्यामुळें ज्यांना संस्कृत येत नव्हतें त्यांची मोठी सोय झाली. त्याचे ग्रंथ फार लोकप्रिय झाले. हे ग्रंथ ओंवीबद्ध आहेत, म्हणजे ओव्यांत लिहिलेले आहेत. भाषा सोपी व सरळ आहे.

त्यानें राम-विजय, हरि-विजय, पांडुरंगमाहात्म्य वगैरे ग्रंथ लिहिले. पण त्याहून त्याचा शिवलीलामृत हा ग्रंथ फारच लोकप्रिय झाला आहे.

शिवलीलामृतामधला अकरावा महानंदेबद्दलचा अध्याय फार लोकप्रिय आहे. पुष्कळ भाविक स्त्रीपुरुष त्याचीं पारायणें करतात. त्याचप्रमाणें श्रियाळ-चरित्र हा चौदावा अध्यायहि तसाच लोकप्रिय आहे.

**श्रियाळ-चांगुणा आख्यान**

कांती नगरीचा राजा श्रियाळ हा मोठा शिवभक्त राजा होता. आपल्याकडे आलेल्या पाहुण्याला इच्छाभोजन देण्याबद्दल त्याची प्रसिद्धि होती. नारदाकडून त्याच्याबद्दलची ही स्तुति श्रीशंकरानें ऐकली. अतिथीचा वेष घेऊन स्वत: शंकर श्रियाळाकडे आला. श्रियाळ नि त्याची पत्नी चांगुणा ह्या दोघांनीं पाहुण्याचें स्वागत केलें. पाहुणा भारीच तापट होता. "इच्छा-भोजन--माझ्या इच्छेला हवें वाटेल तें भोजन--दे. नाहीं तर हा चाललों मीं!" असा तो सारखा धाक घालूं लागला.

श्रियाळ राजानें त्याला इच्छा-भोजन मागण्यास सांगितलें. तेव्हां त्यानें नरमांस--माणसाचें मांस--मागितलें. परंतु चोर किंवा हेर, नाहीं तर गुलाम, असल्या माणसांचें मांस चालणार नाहीं ही अट घातली.


चांगुणा स्वत:चें मांस देण्यास तयार झाली. श्रियाळ स्वत:चें मांस खाण्याचा आग्रह करूं लागला पण पाहुणेबुवा म्हणाले, "तुम्हां उभयतांचें मांस पवित्र आहे. तें मला चालेल; पण तुम्ही सर्व गरीब भिकाऱ्यांचे आईबाप आहांत. तुमचें मांस मीं भक्षण केलें तर तुम्हीं गरिबांना अन्न देतां त्यांत खंड पडेल! तेव्हां तुमचा चिलया नांवाचा पांच वर्षांचा सुकुमार मुलगा आहे, त्याचें मांस मला खाऊं घाला!"

"अवश्य, महाराज! आपण आमच्या बाळाला घेऊन चला." श्रियाळ व चांगुणा बोललीं.

"घेऊन जा? म्हणजे मी काय वाघ किंवा लांडगा आहें तुमच्या मुलाचें मांस कच्चेंच खावयाला? माया दूर सारा नि मला त्याचें मांस शिजवून घाला! त्या वेळीं जर रडाल-बिडाल तर मीं उठून चालता होईन!"

पाहुण्यांचे हे भयंकर शब्द कानांवर पडले तरी चांगुणा शांत होती. तिनें चिलयाला हांका मारून बोलाविलें. आणि पाहुण्यांचें जेवण त्याच्यावांचून खोळंबलें आहे हें त्याला समजावून सांगितलें.

चिलया आपल्या सच्छील आईबापांचा मुलगा—आपलें मांस द्यावयाला तो लगेच तयार झाला. चांगुणा त्याला कडेवर बसवून स्वयंपाकगृहांत गेली. त्याचें डोके मात्र तिनें बाजूला ठेवलें आणि इतर मांस शिजविलें. नंतर तिनें पाहुण्यांना जेवावयास उठविलें. श्रीशंकरानें अंतर्ज्ञानानें सर्व ओळखलें. लगेच चिडून



त्यानें म्हटलें, "सर्व अवयवांत मस्तक महत्त्वाचें! नि तूं तेंच वगळलेंस ना? जा, तें मस्तक इथें घेऊन ये अन् उखळांत घालून माझ्या समोर कांड! पण लक्षांत ठेव. तुझ्या डोळ्यांत जर पाणी आलें तर संपलेंच! मुलापरि मुलगा गेला नि सत्त्वहि जाईल तुम्हां दोघांचें. कारण मीं उपाशी निघून जाईन अशानें!"

बिचारी चांगुणा ! तिनें आपलें मन दगडाहून घट्ट केलें नि बाळ चिलयाचें मस्तक उखळांत घालून ती कांडू लागली.

आतां पाहुणेबुवांना वेगळीच लहर आली. कांडतांना गाणें म्हणण्याची आज्ञा त्यांनीं केली. चांगुणेनें ती लहरहि पुरविली. कांडलेल्या मस्तकाचा पदार्थ तयार झाला. पाहुण्यांनीं यजमानाला आपल्याबरोबर जेवावयाला बसण्यास सांगितलें. श्रियाळाला तें कसेंतरीच वाटलें ! पण चांगुणेनें त्याला धीर दिला. त्या वेळचे चांगुणेचे शब्द श्रीधराच्या ओंव्यांतच ऐका हं आतां.

**चांगुणा म्हणे नृपनाथा। सत्त्व राखावें सत्वर आतां।**
**विन्मुख जाऊं न द्यावें अतीता। मनीं चिंता न धरावी।।**
**नव-मास वाहिला म्यां उदरांत। तुम्हांस जड नोव्हे चौ प्रहरांत।**
**पोटींचा पोटीं घालितां सुत। चिंता काय नृपश्रेष्ठा।।**

त्या प्रेमळ मातेनें केवढें घट्ट मन केलें ! आणि नवऱ्याला त्याचें कर्तव्य करावयास लावलें ! मीं नऊ महिने आपल्या बाळाला पोटांत ठेवलें. तुम्हीं चार प्रहर त्याला (त्याचें मांस) पोटांत ठेवायला काय हरकत आहे ! पोटचा मुलगा पोटांत घालणें का जड वाटतें तुम्हांला ?

तेव्हां श्रियाळ पाहुण्याच्या पंगतीस बसला. मग पाहुण्यानें चांगुणेलाहि जेवावयास बसण्यास सांगितलें अन् तीहि बसली.

नि मग पाहुण्यांनीं एकदम भलतीच कलाटणी घेतली. ते म्हणाले, "छे: छे: ! तुमच्या घरीं अन्न घेणें पाप आहे ! कारण तुम्ही निपुत्रिक आहांत !" —

आतां मात्र चांगुणेचा धीर सुटला. मुलगा गेला नि सत्त्वहि चाललें ! ती हंबरडा फोडून रडूं लागली. शंकराला आळवूं लागली.

तेव्हां पाहुणे बोलले, "तुला काय हवें तें माग बरें तूं—" चांगुणा म्हणाली, "आम्हीं निपुत्रिक आहोंत. हा कलंक दूर करा."

पाहुण्यांनीं म्हटलें, ठीक आहे! मग तूं तुझ्या मुलाला हांक मार तर." पाहुण्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून चांगुणेनें चिलया बाळाला हांका मारल्या.

अन्. काय चमत्कार! पायांतले घुंगुरवाळे वाजवीत चिलया धांवत आला! गाईला वांसरूं भेटलें!—

पाहुण्यांनीं आपला वेष टाकला अन् श्रीशंकर तिथें प्रकटले! ही एकंदर कथाच किती भावनापूर्ण आहे! श्रीधरानें ती फार रसाळ भाषेंत सांगितली आहे. त्यामुळें ती वाचतांना त्यांतील प्रत्येक प्रसंगाशीं मन एकरूप होतें!

उत्तम लिखाणाची कसोटीच ही आहे कीं, तें वाचकाच्या हृदयाला भिडावयास हवें! हें श्रियाळ-चरित्र खरोखरीच हृदयाला भिडतें.

## दासनवमी

ह्यानंतरचा महत्त्वाचा दिवस म्हणजे वद्य कृष्ण नवमी! हिला दासनवमी म्हणतात. ही रामदासस्वामींची पुण्यतिथि आहे.

निजामहद्दींतील जांब गांवीं सूर्याजीपंत ठोसर ह्या नांवाचे कुळकर्णी होते. त्यांच्या बायकोचें नांव राणूबाई. तिच्या पोटीं शके १५३० मध्यें रामनवमीला रामजन्माच्या वेळीं मुलगा जन्मला तेच आपले संत रामदास. म्हणजे रामनवमी ही त्यांची जयंति आहे. त्यांचें खरें नांव नारायण. पण त्यांची रामावर दृढ भक्ति असल्यामुळें त्यांचें रामदास हें नांव पडलें.

पुढें बाराव्या वर्षी त्यांचें लग्न ठरलें. लग्नाचा समारंभ होत असतांना 'सावधान' हे शब्द त्यांच्या कानांत घुसले. ते खरे-खुरे सावध झाले आणि संसाराच्या मोहांत गुंतावयास नको म्हणून स्वारी मंडपांतून पळून गेली !

नतर ते नाशिकजवळच्या पंचवटी क्षेत्रांत रहात होते. मग साताऱ्याजवळील चांफळ गांवीं होते. त्यांनीं बारा वर्षे तीर्थ-यात्रेंत घालविलीं.

शिवाजीमहाराज त्यांचे शिष्य होते. त्यांनीं आपलें सर्व राज्य रामदासांना एकदां अर्पण केलें. समर्थ रामदासांनीं त्याचा स्वीकार केला नि तें परत शिवाजीच्या स्वाधीन केलें !




त्या वेळीं समर्थ म्हणाले, " राजा, आम्हीं विरक्त जन ! आम्हांला राज्य काय करावयाचें ? तूच तें उत्तम संभाळशील. तें परत घे तू; पण माझ्या स्वामित्वाची एवढीच खूण असावी कीं, तुझ्या फौजेचा झेंडा भगवा असावा ! " तेव्हांपासून समर्थांच्या गव्या वस्त्रासारखा मराठ्यांचा झेंडा भगवा झाला !

खालच्या वर्गातील हिंदू लोक वरच्या वर्गातील लोकांना मान देण्यासाठीं 'जोहार मायबाप' असें म्हणत. रामदासांच्या सांगण्यावरून शिवाजीनें त्याच्याऐवजीं 'रामराम' म्हणण्याची प्रथा पाडली.

प्रत्यक्ष श्रीराम हाच रामदासांचा गुरु होता. ते अतिशय विरक्त होते. 'श्रीराम जयराम जयजय राम' ह्या तेरा अक्षरी मंत्राचा ते उपदेश करीत.

प्रतापगडावरील भवानी देवीची स्थापना शिवाजीनें त्यांच्या हस्तें केली.

नंतर निवांतपणें रहाण्यासाठीं ते सातार्‍याजवळ परळी



म्हणून किल्ला आहे तिथें जाऊन राहिले. अर्थातच त्यांच्या भेटीसाठीं तिथें संतमंडळी येऊं लागली. त्यामुळें त्या किल्ल्याला सज्जनगड हें नांव पडलें. कल्याणस्वामी नांवाचे त्यांचे एक शिष्य होते. त्यांच्यावर रामदासांचा फार लोभ होता.

रामदासांचा दासबोध हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. पण त्यांचे 'मनाचे श्लोक' नि 'करुणाष्टकें' कित्येक महाराष्ट्रीय स्त्री-पुरुषांना तोंडपाठ असतात. आणि गणेशचतुर्थीच्या वेळीं आपण मोठ्या आवडीनें 'सुखकर्ता दुःखहर्ता' ही आरती म्हणतों तीहि समर्थांनींच केलेली आहे.

त्यांचें वाङ्मय फार स्फूर्तिदायक आहे. आणि ते स्वतः विरक्त होते तरी त्यांनीं आपल्या शिष्यांना वैराग्याचा उपदेश केला नाहीं. 'आधीं संसार करावा नेटका' असें ते सांगत. संसार नीट करा नि मग ईश्वराची सेवा करा. म्हणजे जें आपलें मुख्य कर्तव्य असेल तें आधीं करावें प्रत्येकानें.

विद्यार्थ्यांचें मुख्य कर्तव्य मनापासून अभ्यास करणें. तें आधीं पार पाडावें नि मग इतर खटपटी, लटपटी कराव्या. अवांतर छंद जोडून द्यावे.

### तानाजी पुण्यतिथि

ह्या दासनवमीला एका शूर सेवकाचा मृत्युदिन येतो. त्या सेवकाचें नांव तानाजी मालुसरे.

हा विद्वान् नव्हता, संत नव्हता; पण तरीहि मोठा होता. त्याची पुण्यतिथि साजरी करावी ह्या लायकीचा होता!

तानाजी हा शिवाजीमहाराजांचा बालमित्र होता. त्याचा मुलगा रायबा ह्याचें लग्न त्यानें ठरविलें आणि आपल्या शिवबा-राजाला लग्नाचें आमंत्रण द्यावयाला तो गेला. त्याच वेळीं जिजाबाईनीं शिवबाला कोंडाणा किल्ला मुसलमानांच्या हातून घेण्याबद्दल सुचविलें. तसा तानाजी पुढें सरला नि कोंडाण्याच्या स्वारीवर आपल्याला धाडण्याबद्दल त्यानें राजाला गळ घातली.


"तानाजी! अरे, तुझ्या लेकाचें लग्न आहे ना आतां?" महाराज म्हणाले.

"हांऽ! पण राजे, आधीं कोंडाण्याचें लगीन नि मग रायबाचें लगीन!" मिशीला पीळ देत तानाजी बोलला.

केवढी ही स्वामिभक्ति ! नि किती ही कर्तव्याबद्दलची दक्षता ! तो आपल्या मुलाबाळांचा बाप नि बायकोचा नवरा होता ! पण प्रथम आपल्या शिवबाचा शिलेदार होता !

२२६४९

एकुलत्या एक लेकाचें लग्न तानाजीनें लांबणीवर टाकलें.



तो कोंडाण्याच्या स्वारीवर गेला. तिथला सरदार उदेभानू ह्याच्याशीं तो निकरानें लढला. उदेभानू मेला. पण तानाजीहि पडला !

कोंडाणागडावर चढतांनाच त्याला अपशकुन झाला होता. त्यानें आपल्या यशवंती नांवाच्या घोरपडीच्या कबरेला दोर बांधला नि किल्ल्याच्या तटावर चढण्यासाठीं तिला सोडली. पण नेहमींप्रमाणें ती सरसर वर चढली नाहीं. ती मागें परतून आली. एकदांच नव्हे, तर दोनदां असें झालें. तेव्हां तानाजी रागाला आला नि आपल्या लाडक्या यशवंतीला म्हणाला, “यशवंती ! आतां बऱ्या बोलानें वर चढलीस तर ठीक ! नाहींतर तुझीं खांडोळीं करून भाकरीसंगं खाईन बरं का मी !”

यशवंती ह्या खेपेला वर चढून गेली नि तटाच्या टोंका-वर दगडांच्या खबदाडींत नखें रोंवून राहिली. विलक्षण चिवट असतात ह्या घोरपडी ! तिच्या कंबरेला बांधलेल्या

दोराला धरून तानाजी नि त्याचे मावळे वरतीं चढले. तानाजीनें प्रयत्नाची शिकस्त केली. कोंडाणा किल्ला मराठ्यांच्या हातीं आला. मराठ्यांचा भगवा झेंडा बुरुजावर फडकला ! पण–पण—

पण तानाजी पडला ! –अन् शिवाजीनें अतिशय खेदानें उद्गार काढला, "गड आला ! पण सिंह गेला !"––

सिंह ! –होय–तानाजी सिंहासारखा शूर होता ! अन् म्हणूनच कोंडाण्याचें नांव बदलून सिंहगड ठेवण्यांत आलें !

तेव्हां ह्या नरवीर तानाजीची पुण्यतिथीहि ह्या दिवशीं साजरी करावयास हवी ! त्या दिवशीं शक्य तर सिंहगडची सफर काढावी. गडावर ह्या वीराची समाधि आहे. तिचें दर्शन घ्यावें. कांहीं वेळ त्या जुन्या काळांत रमावें. म्हणजे आपल्या मनालाहि वेगळाच उत्साह वाटेल. स्वराज्यासाठीं स्वतःचें बलिदान दिलें त्या मावळ्यानें ! त्याच्या त्यागाबद्दल आदर दाखविणें हें आपलें कर्तव्य आहे !

**महाशिवरात्र**

ह्यानंतरचा महत्त्वाचा दिवस म्हणजे महाशिवरात्र ! माघांतील कृष्ण चतुर्दशीला ती येते. त्या दिवशीं शिवभक्त उपवास करतात.

महाशिवरात्रीची कथा मोठी मजेदार आहे. प्राचीन काळची गोष्ट. एकदां माघ वद्य चतुर्दशीच्या दिवशीं एक व्याध–पारधी–शिकारीसाठीं रानांत जाण्यास निघाला. कांहीं वेळानें तो एका तळ्याजवळ आला. त्याच्या कांठीं एक बेलाचें झाड होतें. शिकार करण्यासाठीं तो त्या झाडावर दबा धरून बसला. पण पानांचें झुबके आड येऊं लागल्यामुळें त्याला शिकार नीट हेरतां येईना. तेव्हां आपल्या डोळ्यांसमोर येणारीं बेलाचीं पानें तो तोडून खालीं टाकू लागला.

योगायोग असा कीं, त्या झाडाच्या खालीं शिवाची पिंडी होती. तिच्यावर नेमकीं हीं बेलाचीं पानें पडूं लागलीं !

इतक्यांत त्याला समोरून कांहीं हरणें पाणी पिण्यासाठीं तळ्याकडे येत असतांना दिसलीं. त्यासरशी त्यानें आपला तिर-कामठा सज्ज केला आणि त्यानें त्या कळपांतील एका हरिणीवर नेम धरला.

व्याधाच्या हालचालीची हरिणीला चाहूल लागली. तेव्हां ती त्याला ओरडून म्हणाली, " अरे व्याधा, जरा थांब. इतक्यां-तच तुझा तीर माझ्यावर सोडूं नकोस. घरीं माझीं पाडसें माझी वाट पहात आहेत. त्यांना मला एकदां भेटून येऊं दे. त्यानंतर तूं खुशाल माझे प्राण घे. "

अन् हरिणीची ही विनवणी ऐकून पारध्याचें मन कळवळलें. त्यानें तिला घरीं जाण्याची परवानगी दिली. ती परत येण्याची वाट पहात तो झाडावर बसून राहिला. रात्रभर कांहीं खावयाला न मिळाल्यामुळें त्याला आपोआपच शिवरात्रीचा उपास घडला. हातानें शिवाच्या पिंडीवर बेलाचा वर्षाव झाला होता ! तोंडानें शिवनामाचा गजर झाला होता नि कसें कोण जाणे, व्याधाचें चित्त हळुवार, दयामय बनलें.

त्यांतच सूर्योदयापूर्वी ती हरिणी आपल्या सबंध कळपासह तिथें आली आणि आतां खुशाल आपला प्राण घे असें ती बोलली.

व्याध थक्क झाला ! हरिणीच्या प्रामाणिकपणाचें त्याला कौतुक वाटलें. त्याचें मन आधींच मृदु बनलें होतें. तें आतां अगदींच विरघळलें ! त्यानें हरिणीला मारण्याचा विचार सोडून दिला. त्यामुळें श्रीशंकर त्याच्यावर प्रसन्न झाले आणि यांनीं त्या सर्वांना विमानांत बसवून स्वर्गांत नेलें.

रात्रीच्या वेळीं आकाशांत दिसणारें मृग नक्षत्र म्हणजेच ती हरिणी ! नि ह्या मृग नक्षत्राशेजारींच व्याधाची चांदणी चमकत असते. व्याधाचा ताराहि म्हणतात तिला. तोच हा व्याध.

शिवरात्रीच्या कथेबरोबर हा माघ महिनाहि संपला.

**या माघ महिन्यांत** वसंतपंचमीचा उत्सव—नंतर शीतलाषष्ठी, रथसप्तमी येते. रथसप्तमीपासूत सूर्याची महति आपणांस कळते. नरहरी सोनार व रामदास ह्यांच्या चरित्रापासून आपल्याला उत्तम बोध मिळतो ! नि तानाजी मालुसऱ्याची हकीकत ऐकली कीं, आपल्या अंगांतील उत्साह वाढतो ! नि आपणहि कर्तव्यनिष्ठ व्हावयाचें ही इच्छा दृढ होते. तसेंच श्रीधर कवीची माहिती कळल्यामुळें त्याचे सोपे पण रसाळ ग्रंथ वाचण्याची उत्सुकता वाटते !

शिवरात्रीचें माहात्म्य कळलें ना ? चांगलें कृत्य कधीं वांया जात नाहीं, हें सार आलें ना लक्षांत ? व्याध हे जात्या निर्दय लोक ! पशुपक्ष्यांचें कच्चें मांससुद्धां खातात ते ! पण त्या व्याधाचें हृदय दयेनें भरलें आणि त्यानें हरिणीला जीवदान दिलें ! त्यांत त्याच्या हातून शिवरात्रीचें व्रत नकळत घडलें. त्यामुळें त्याला स्वर्गप्राप्ति झाली नि व्याधाच्या रूपानें तो अमर झाला !

### स्वाध्याय

(१) नरहरी सोनाराच्या कथेपासून तुम्ही काय बोध घ्याल ?
(२) शंकरानें श्रियाळ राजा व राणी चांगुणा यांची कशी परीक्षा पाहिली ?
(३) महाशिवरात्रीबद्दलची व्याधाची कथा सांगा.
(४) थोडक्यांत माहिती द्या :—(अ) तानाजी मालुसरे. (ब) रामदास. (क) श्रीधरस्वामी.

२२६१७
वाळवपुस्य
२३
३०-११-३०
म. ग्रं. सं. ठाणे
दा. क्र. ६२५०
वि. ... वा. वा.
IRBK-0106250
IRBK-0106250